(७१)

(१०७)

प. क्र. व्हीपीएम/२६९८/प्र. /७४५/२२.
ग्राम विकास व जल संधारण विभाग, मंत्रालय
मुंबई - ४०० ०३२. दिनांक-१३ जुलै १९९८.

प्रति,

विभागीय आयुक्त [सर्व]

विषय :- मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ४ अन्वये ग्रामपंचायत विभाजनाचे / एकत्रिकरणाचे विशिष्ट भागासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबतचे प्रस्ताव शासनास सादर करण्यासंदर्भातच्या सूचना......

संदर्भ :- १] शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम/११८९/कें. न. ३०१०/२२. दिनांक-५/२/९०.

२] शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम/११९८/प्र. ६२३/२२. दिनांक-९ मार्च १९९८.

३] राज्य निवडणूक आयोग परिपत्रक, क्रम रानिआ/१०९८/ प्रक्र. ११२/९८/पंरा. दिनांक- १६ फेब्रुवारी ९८.

---

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ४ नुसार स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबतचे अधिकार राज्य शासनाकडे आहेत. यास्तव याबाबतचे प्रस्ताव मोठ्या प्रमाणात विभागीय आयुक्त यांच्या कडून शासनास प्राप्त होत असतात. शासन स्तरा-वर मोठ्या प्रमाणावर प्राप्त होणा-या या प्रस्तावाची छाननी करणे जरुरीचे व वेळ्या अपव्यय करणारे असते. यास्तव सर्व विभागीय आयुक्त यांना स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेसंदर्भातील शासनास पाठविण्यात येणा-या प्रस्तावासंदर्भात संदर्भाधीन शासन परिपत्रक क्र. २ दिनांक-९ मार्च ९८ अन्वये सूचना देण्यांत आल्या आहेत. अशी सूचना देण्यातयेवूनही शासनास प्राप्त होणारे प्रस्ताव संदर्भाधीन क्र. १ शासन परिपत्रक दिनांक ५/२/९०. मधील तसेच शासनाने यासंदर्भात तदनंतर वेळोवेळी निर्गमीत केलेल्या परिपत्र-कातील अटी व निकषांची पूर्तता करणारे नसतात. तसेच प्रस्ताव संदर्भाधीन दिनांक-९ मार्च ९८ च्या परिपत्रकाप्रमाणे व विहीत प्रस्तावात नसतात. तसेच प्रस्तावासोबत प्रस्तावाची पूर्ण माहिती देणारे व विभागीय आयुक्तांच्या स्पष्ट शिफारशीचे पत्र नसते. यास्तव नाईलाजाने शासनास असे प्रस्ताव अनेकवेळा विभागीय आयुक्तांना परत करावे लागतात. यास्तव प्रस्ताव पाठवितांना पुढील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यांच्या सूचना पुन एकदा सर्व विभागीय आयुक्त यांना देण्यांत येत आहेत.

16/10/98

.... २ .....

१] प्रस्ताव परिपुर्ण असणे आवश्यक आहे.

स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यांच्या प्रस्तावांची शासनाच्या निकषानुसार पुर्ण छाननी विभागीय आयुक्त कार्यालयाने करणे आवश्यक आहे. तसेच सदर प्रस्ताव शासन परिपत्रक दिनांक-५/२/९०. मधील व शासनाचे या संदर्भात वेळोवेळी निर्गमीत केलेल्या परिपत्रकातील अटी व निकषांची पुर्ण पुर्तता करणारा आहे. किंवा कसे हे तपासणे आवश्यक आहे. व अशी पूर्ण पूर्तता होत असेल तरच अंतिम निर्णयासाठी विभागीय आयुक्तांच्या स्पष्ट शिफारसीसह प्रस्ताव शासनास सादर करावेत. अटी व निकषांची पुर्ण पूर्तता न करणारे प्रस्ताव शासनास सादर करण्यांत येऊ नयेत.

२] प्रस्तावा बाबत.

प्रस्ताव शासनाच्या परिपत्रक क्र. व्हीपीएम. ११९८/प्र. ६२३/२२. दिनांक- ९ मार्च ९८. अन्वये दिलेल्या सूचना प्रमाणेच आणि विहित प्रपत्रात असावा. प्रस्तावात आवश्यक सर्व कागदपत्रे असावयास हवीत. दिनांक-९ मार्च ९८ च्या विहित प्रपत्रातील अ.क्र. १ व २ मध्ये प्रस्तावित ग्रामपंचायतीची नावे व प्रत्येक प्रस्तावित ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ठ होणा-या महसूली गावांची नावे व त्यांची लोकसंख्या दरडोई उत्पन्न नमूद करणे आवश्यक आहे. महसूली गावीचे प्रमाणपत्रही असणे आवश्यक आहे.

३] प्रस्तावा सोबत विभागीय आयुक्तांनी शासनास सादर करावयाचे पत्र.

अ] शासन स्तरावर प्रस्तावातील ग्रामपंचायतीची प्रस्ताव बाबतची माहिती उपलब्ध नसते. यास्तव शासनास प्रस्ताव सादर करतांना पाठवावयाच्या शिफारशीच्या पत्रामध्ये प्रस्तावाची पुर्ण माहिती नमूद करणे अंत्यंत आवश्यक आहे.

ब] न्यायालयीन संदर्भ असल्यास त्याबाबतची परिपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे.

क] "प्रस्ताव शासनाच्या दिनांक-५/२/९०. च्या परिपत्रा प्रमाणे व तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमीत केलेल्या अटी व निकषाप्रमाणे आहे. यास्तव स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यांस हरकत नसावी. अशी विभागीय आयुक्त यांची स्पष्ट शिफारस असणे आवश्यक आहे.

ड] स्वतंत्र ग्रामपंचायतीचे गांवे अधिसूचनेव्दारे जाहीर करताना केवळ महसूली गांवाचा विचार केला जातो. यास्तव प्रस्तावामध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या ग्रामपंचायत मधील महसूल गांवे आणि विभाजनानंतर/एकत्रिकरण /त्रिशंकु ठिकाणी/ग्रामपंचायतीची स्थापना झाल्यानंतर/अस्थित्वात येणा-या प्रत्येक ग्रामपंतीमध्ये कोणती महसूली गांवे गावें समाविष्ठ होणार आहेत याची स्पष्ट सूची पत्रांत नमूद करणे आवश्यक आहे.

तसेच प्रस्तावित ग्रामपंचायतीमध्ये एकापेक्षा अधिक महसूली गांवे समाविष्ठ असतील तर प्रस्तावित ग्रामपंचायतीचे गांव जास्त लोकसंख्या असलेल्या महसूली गावाच्या नावे ओळखले जाते. या बाबीचा विचार करुन प्रस्तावित ग्रामपंचायतीचे नांव व त्यामधील समाविष्ट प्रत्येक महसूली गावाची लोकसंख्या

.... ३...

दरडोई उत्पन्न नमुद करणे आवश्यक आहे.

वास्तव याबाबतची माहितीही खालील तक्त्यात सदर पत्रात नमूद करण्यांत यावी.

१] सध्या अस्तित्वात असणा–या ग्रामपंचायतीचे नाव :-

४] त्या ग्रामपंचायती मधील समाविष्ठ महसूली गांवे :-

२] विभाजनानंतर/एकत्रिकरणानंतर/त्रिशंकु क्षेत्राच्या ठिकाणी ग्रामपंचायत स्थापन झाल्यानंतर अस्तित्वात येणा–या प्रत्येक ग्रामपंचायतीची माहिती.

| विभाजनानंतर/ एकत्रिकरणानंतर/ त्रिशंकु ठिकाणी स्वतंत्र ग्रा. पं. स्थापन झाल्यानंतर/अस्थित्वात येणा–या/ प्रस्तावीत ग्रा. पं. चे नांव. | समाविष्ठ महसूली गांवे | प्रत्येक महसूली गांव संदर्भात. लोकसंख्या. | उत्पन्न. | दरडोई उत्पन्न. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

३] विद्यमान ग्रामपंचायत निवडणुकीची तारीख :-

पुढील निवडणुकीची तारीख :-

४] स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यांची कारणे :-

५] विद्यमान ग्रामपंचायत व जिल्हा परिषदेची शिफारस व ठराव. :-

६] मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद :--------------- व विभागीय आयुक्त ---------------यांनी स्वंतत्र ग्राम पंचायत स्थापन करण्याबाबत शिफारस केली आहे.

त्याचप्रमाणे ग्रामपंचायत अनुसूचीत क्षेत्रातील असल्यास त्याप्रमाणे पत्रात उल्लेख करावा.

वरिल सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन- शासन परिपत्रक दिनांक- ५/२/६० मधील व तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमीत केलेल्या परिपत्रक व पत्रामधील अटी व निकषांची पूर्ण पूर्तता करुनच संदर्भाधीन परिपत्रक ..... ४...

क्र. २ दिनांक- १ मार्च १९८८ अन्वये दिलेल्या सूचनाप्रमाणेच शासनास परिपुर्ण प्रस्ताव अंतिम निर्णयासाठी सादर करावेत.

सही/- xxxx

[ रा. का. पवार ]

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद [सर्व] यांना उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

-----------००००-----------

ग्रामपंचायत विभाजन [illegible] समवेत पाठवायाचे प्रपत्र.

१) सध्या अस्तित्वात असणा-या ग्रामपंचायतीचे नांव :-

(अ) त्या ग्रामपंचायत मधील समाविष्ट महसूली गांवे :-

२) विभाजना नंतर अस्तित्वात येणा-या प्रत्येक ग्रामपंचायतीची माहिती :-

| विभाजना नंतर अस्तित्वात येणा-या ग्रा.पं.ची नांवे | समाविष्ट महसूली गांवे. (x) | [१९९१च्या जनगणनेनुसार लोकसंख्या. | प्रत्येक महसूली गांव संदर्भात. | |
|---|---|---|---|---|
| | | | उत्पन्न | दरडोई उत्पन्न. |
| १. | २. | ३. | ४. | ५. |

(x) महसूली गांव असलेबाबत तहसीलदार यांच्या स्वाक्षरीचा दाखला जोडणे आवश्यक.

३) विद्यमान ग्रामपंचायत निवडणूकीची तारीख :-

मुदत संपणेची तारीख :-

४) स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याची कारणे :-

५) विद्यमान ग्रामपंचायत व जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीची शिफारस व ठराव क्र. व दिनांक :-

६) मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस :- प्रस्ताव शासनाच्या दिनांक ५.२.९० मध्ये च्या परिपत्रकाप्रमाणे व तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी व निकषाप्रमाणे आहे. यास्तव स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यास हरकत नसावी.

७) ग्रामपंचायत अनुसूचित क्षेत्रातील असल्यास त्याबाबत राजपत्रातील अनुक्रमांक नमूद करुन त्याबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी, [ग्रा.पं.] यांच्या स्वाक्षरीचा दाखला.